# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

# कोयना एज्युकेशनमुळे तालुक्यातील दुर्गम भागात शिक्षण पोहचले: डॉ.माणिकराव साळुंखे

**पाटण : पुढारी वृत्तसेवा**

कोयना एज्युकेशन सोसायटीमुळे अतिदुर्गम, तळागाळातील सर्वसामान्य बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचली. डॉ. सोपानराव चव्हाण यांनी शिक्षणाच्या माध्यमातून अलौकिक कार्य केले, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.माणिकराव साळुंखे यांनी केले.



**पाटण: बोलताना डॉ.माणिकराव साळुंखे व्यासपीठावर विक्रमसिंह पाटणकर, अमरसिंह पाटणकर, डॉ.प्रल्हाद चव्हाण, याज्ञसेन पाटणकर.**

येथील कोयना एज्युकेशन सोसायटी व महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी माजी सार्वजनिक बांधकाम व पर्यटनमंत्री विक्रमसिंह पाटणकर,कोयना एज्यूकेशन सोसायाटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिहं पाटणकर, संस्थेचे संचालक डॉ.प्रल्हाद चव्हाण,याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, पृथ्वीराज पाटील, दादासो जाधव, कवयित्री सौ.मीरा चव्हाण, डी.डी.चव्हाण तसेच चव्हाण कुटुंबिय, पदाधिकारी उपस्थित होते.

विक्रमसिंह पाटणकर म्हणाले, डॉ. सोपानराव चव्हाण यांनी मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने केले. डॉ. सोपानराव चव्हाण, संस्थेचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर चरित्रग्रंथाचे लेखक डी.डी.चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. संजय इंगवले यांनी प्रास्ताविक केले.